# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

MMRDA

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

सी-१४ व १५, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र.- **२६५९४०००**, वेबसाईट : **https.mmrda.maharashtra.gov.in**

## सूचना

## मुंबई महानगर प्रदेशासाठी प्रसिध्द झालेली प्रारुप प्रादेशिक योजना, २०१६-३६ संदर्भात प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींची तालुकानिहाय सुनावणी

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये आणि महानगर नियोजन समितीने प्राधिकृत केल्यानुसार, प्रारुप मुंबई महानगर प्रादेशिक योजना २०१६-३६ दि. १९.०९.२०१६ रोजी प्रसिध्द केली व त्यासंबंधी जनतेकडून सूचना /हरकती मागविण्यात आल्या. त्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या सूचना / हरकतींची सुनावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मुंबई येथील कार्यालयात पार पडली. सदर सुनावणीच्या वेळी अर्जदारांनी केलेल्या विनंतीनुसार लोकांच्या सोयीकरिता आणखी एक संधी म्हणून सदर सुनावणी तालुक्यांच्या ठिकाणी आयोजित करण्यात येत आहे.

अर्जदाराने प्राधिकरणास लेखी पाठविलेल्या तसेच प्राधिकरणाच्या कार्यालयात सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या सर्व सूचना व हरकतींवर नियोजन उपसमिती विचार करणार असल्यामुळे सदर सुनावणीस उपस्थित राहणे आवश्यक आहे असे नाही, तरी अर्जदारांच्या विनंतीनूसार तालुक्यांच्या ठिकाणी खालील वेळापत्रकांनुसार सुनावणी आयोजित करण्यात येत आहे.

| क्र. | दिनांक | तालुका | सुनावणीचे स्थळ | सुनावणीची वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | १४.०८.२०१७ | पेण | आगरी समाज सभागृह, चिंचपाडा रोड, चिंचपाडा, मु.पो.ता. पेण, जि. रायगड - ४०२१०७ | स.११.०० ते १.०० वा.<br>सायं. २.०० ते ४.०० वा. |
| २. | १८.०८.२०१७ | अलिबाग | जंजिरा सभागृह, पोलिस मुख्यालय, अलिबाग मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड - ४०२२०१ | स.११.०० ते १.०० वा.<br>सायं. २.०० ते ४.०० वा. |
| ३. | १९.०८.२०१७ | पनवेल | जेष्ठ नागरिक संघ सभागृह, काळण समाज हॉलच्या शेजारी, जुने पनवेल, मु.पो.ता. पनवेल, जि. रायगड | स.११.०० ते १.०० वा.<br>सायं. २.०० ते ४.०० वा. |
| ४. | २१.०८.२०१७ | उरण | जे.एन्.पी.टी. टाऊनशीप मल्टीपर्पज हॉल, शेवा, तालुका - उरण, जि. रायगड - ४००७०२ | स.११.०० ते १.०० वा.<br>सायं. २.०० ते ४.०० वा. |

सुनावणीच्या वेळी प्राधिकरणाद्वारे यापूर्वी पाठविण्यात आलेले पत्र सोबत घेऊन यावे.

**दिनांक :** ०८/०८/२०१७

**ठिकाण :** मुंबई

**यु.पी.एस. मदान**
**महानगर आयुक्त**

**Size : 12 x 14**